**विशेष दिवाणी दावा क्र.  १७/२०२४**
मनिषा वि. कार्यकारी अभियंता
**निशाणी क्रमांक ५३**

**वादी तर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा शपथेवर जबाब**

**नावः– डॉ. सुरज श्रीराम लोमटे**

**वयः– ३० वर्षे**

**धंदाः– डॉक्टर**

**राहणारः– शेळगाव, ता. परंडा, जि. धाराशिव**

**सरतपास अॅड. एस. एन. माने यांच्यातर्फे**

१. माझी पदवी एम. बी. बी. एस असून मी सप्टेंबर, २०२१ पासून शेळगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहे. दिनांक १३.०७.२०२४ रोजी रुग्ण भालचंद्र सुदाम घोगरे यांना काही लोक उपचाराकरिता प्राथमिक आरोग्य केंद्र, शेळगाव येथे आणले होते. मी प्राथमिक तपासणी केली असता भालचंद्र सुदाम घोगरे हे दवाखान्यात आणण्यापुर्वीच मयत असल्याचे दिसून आले आणि मी तशी कल्पना सदरच्या लोकांना दिली होती. मी भालचंद्र सुदाम घोगरे यांचा मरणोत्तर पंचनामा (Postmortem report) माझ्या तपासणीत असे दिसून आले की, भालचंद्र सुदाम घोगरे यांच्या डाव्या हाताच्या अंगठा व इंडेक्स फिगरच्या मध्ये विद्युत झटका लागल्यामुळे जखम झालेली होती. भालचंद्र सुदाम घोगरे यांचा मृत्यू विद्युत झटक्यामुळे झाल्याचे माझ्या तपासणीत दिसून आले आणि त्याप्रमाणे मी तसा पोस्ट मॉर्टम रिपोट दिला. आता मला पोस्ट मॉर्टम रिपोर्ट दाखवण्यात आला. सदर पोस्ट मॉर्टम रिपोर्ट मी स्वतः तयार केलेला होता. त्यातील मजकुर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर माझी सही व दवाखान्याचा शिक्का आहे. पोस्ट मॉर्टम रिपोर्ट निशाणी क्रमांक २९ वर आहे. मृत्यूचे कारण पान क्रमांक ७ मध्ये नमुद आह

**प्रतिवादी क्रमांक २ व ३ तर्फे उलटतपास अॅड. एस. पी. भालेराव यांच्याकडून**

२. मृत भालचंद्र सुदाम घोगरे यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात पोलिसांनी पाठवून दिलेले होते. संबंधीत मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी त्यांना दवाखान्यात आणलेले होते.

पोलिसांनी माझ्या नावाने पत्र दिलेले नव्हते. साक्षीदार स्वतः सांगतो की सोबत असलेले लोकांनी पोलिसांनी दिलेल्या इन्क्वेस्ट पंचनाम्याची प्रत घेऊन आले होते. ज्या लोकांनी मृतास घेऊन आले होते त्यांचे नाव मी सांगु शकत नाही. ज्या लोकांनी मृतास आणलेले होते त्यांच्या सहया मी घेतलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्राथमिक केंद्र, शेळगाव या ठिकाणी मृत व्यक्तीचा पोस्ट मॉर्टम करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोस्ट मॉर्टम करण्याकरिता कमीत कमी तीन डॉक्टरांची आवश्यकता असते. हे म्हणणे खरे नाही की, मृत व्यक्तीच्या नातेवाईकाच्या सांगण्यावरुन विद्युत झटक्यामुळे मृत्यू झाला आहे, असे खोटे कारण नमुद केले आहे. पोस्ट मॉर्टम करताना दवाखान्यात मला सहाय्यक होता. तो सहाय्यक डॉक्टर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः जातीने भालचंद्र सुदाम घोगरे यांचा पोस्ट मॉर्टम केलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः मयत भालचंद्र सुदाम घोगरे यांची तपासणी केली होती, हे मी खोटे सांगत आहे. भालचंद्र सुदाम घोगरे हे दवाखान्यात घेऊन येण्यापुर्वीच मृत पावले होते. मला निश्चीत कोणत्या वेळेस ते मृत पावले होते हे सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोस्ट मॉर्टम करताना मृत्यूचा वेळ समजतो. हे म्हणणे खरेनाही की भालचंद्र सुदाम घोगरे यांचे मृत्यूचे कारण विद्युत झटक्याने झाले आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मृत व्यक्तीच्या नातेवाईकांच्या सांगण्यावरुन खोटया स्वरुपाचा पोस्ट मॉर्टम रिपोर्ट तयार केला आहे. हे म्हणणे खरे आहे की एखादा व्यक्ती आपल्या हाताने विद्युत पुरवठयाची तार धरल्यास त्याच्या हाताला जखम होऊ शकते. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.03.11 11:22:23 +0530

दिनांकः–१०.०३.२०२६

**अ. अ. शेख**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 10-03-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 10-03-2026 |
| Order uploaded on | - | 11-03-2026 |